महाराष्ट्र शासन

# उपनिबंधक, सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई

यांचे कार्यालय

**शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (महाराष्ट्र) मर्यादीत**

बेलापूर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं. ८, ५ वा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.

E-mail Id - dyregcidco@gmail.com

जा.क्र. उनि/ससं/सिडको/कलम७९अ/1880 /२०२६ दिनांक :05/०५/२०२६

प्रति,

**अध्यक्ष / सचिव,**
**हॅप्पी होम को.ऑप.हौ.सो. लि.,**
**बिल्डींग नं. डी-११६ ते डी-१३९,**
**सेक्टर- २६, वाशी, नवी मुंबई**

**विषय :- संस्था इमारत पुनर्विकासाबाबत.**

संदर्भ :- १) संस्थेकडील दिनाक १०/०४/२०२६ रोजीचा प्राप्त प्रस्ताव

२) या कार्यालयाकडील प्राधिकृत अधिकारी नियुक्तीबाबतचे दिनांक २३/०४/२०२६ रोजीचे पत्र.

३) प्राधिकृत अधिकारी यांनी या कार्यालयास दिनांक ०४-/०५/२०२६ रोजी सादर केलेला विशेष सर्वसाधारण सभेचा अहवाल

४) सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीच्या पुर्नविकास करणेबाबतचे महाराष्ट्र शासन पणन व वस्त्रोद्योग विभागाचे शा.नि.क्र.सगृयो २०१८/प्र.क्र.८५/१४-स, दिनांक ०४/०७/२०१९ रोजीचे शासन निदेश.

उपनिबंधक सहकारी संस्था सिडको नवी मुंबई

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अवलोकन व्हावे.

२/- हॅप्पी होम को.ऑप.हौ.सो. लि., बिल्डींग नं. डी-११६ ते डी-१३९, सेक्टर- २६, वाशी, नवी मुंबई ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९(१) अन्वये नोंदणीकृत संस्था असून तीचा नोंदणी क्र. टि.एन.ए (टि.एन.ए)/एचएसजी/(टि.सी.)/६८७७/१९९४-९५ असा आहे.

संस्थेकडील संदर्भ क्र. ०१ रोजीच्या विषयांकीत प्रस्तावास अनुसरुन, संस्था इमारत पुर्नविकासाकरीता, विकासक निवड करणेबाबतच्या दिनांक ०१/०५/२०२६ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणेकरिता या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ०२ अन्वये श्री. निलेश खंडाळकर, सहकार अधिकारी श्रेणी-२ अधिन उपनिबंधक सहकारी संस्था, सिडको यांना प्राधिकृत करण्यांत आले होते.

संस्था इमारत पुर्नविकासाकरीता आयोजित केलेल्या दिनांक ०१/०५/२०२६ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेचा अहवाल दिनांक ०४/०५/२०२६ रोजी या कार्यालयास सादर केला आहे. सदर अहवालाचे व सहपत्रांचे अवलोकन केले असता, संस्था इमारतीच्या पुर्नविकासाकरिता संस्थेच्या दिनांक ०६/०७/२०२५ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेत वास्तुविशारद श्री केदार साटम यांची प्रकल्प व्यपस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नियुक्ती करण्यांत आलेली आहे. संस्था इमारतीच्या पुर्नविकासाच्या अनुषंगाने विकासक निवडीबाबतची सभा श्री स्वामी विवेकानंद शिक्षण

संस्था, विद्यालय नवी मुंबई, वाशी, नवी मुंबई येथे दिनांक ०१/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदर विशेष सर्वसाधारण सभेत संस्थेच्या एकुण ११८ सदनिकांसाठी असणाऱ्या ११० सभासदांपैकी विशेष सर्वसाधारण सभेत ९८ सभासद उपस्थित आहेत. सभेस उपस्थित सभासदांची टक्केवारी ८९% इतकी आहे. त्यामुळे शासन निर्णय दिनांक ०४/०७/२०१९ मधील १७ (क) प्रमाणे विशेष सर्वसाधारण सभेचा कोरम पूर्ण झाला आहे.

सस्था इमारतीच्या पुनर्विकासाचे अनुषगांने दिनांक ०१/०५/२०२६ रोजी आयोजित केलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत संस्थेच्या ११० सभासदांपैकी सभेस उपस्थित असलेल्या ९८ सभासदांनी संस्था इमारतीचा पुनर्विकास करणेसाठी विकासक म्हाणून **M/s. Paradise Infracon Pvt. Ltd** यांची विकासक म्हणून नेमणूक केलेली आहे व तसा विकासक नियुक्तीचा ठराव उपस्थित असलेल्या सभासदांनी सर्वानुमते केलेला आहे.

सबब, संस्थेने या कार्यालयात दाखल केलेला पुनर्विकासाचा प्रस्ताव, संस्थेच्या दिनांक ०१/०५/२०२६ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त व प्राधिकृत अधिकारी यांनी या कार्यालयात दाखल केलेल्या अहवालाचे अवलोकन केले असता संस्थेने इमारतीच्या पुनर्विकासासाठी **M/s. Paradise Infracon Pvt. Ltd** यांची नियुक्ती केल्याचे निदर्शनास येते तसेच सदर संस्थेचे पुनर्विकासाबाबतच्या विशेष सर्व साधारण सभेचे इतिवृत्त, सभेचे व्हिडीओ चित्रीकरणाचा पेनड्राईव्ह, सभासदांची संमतीपत्रे या कागदपत्रांची नोंद या कार्यालय स्तरावर घेण्यांत येत आहे.

उपनिबंधक सहकारी संस्था सिडको नवी मुंबई सत्यमेव जयते

(प्रताप पाटील)
उपनिबंधक,
**सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**
मा. अतिरिक्त नगररचना अधिकारी, बांधकाम विभाग, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई.

सही।-
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था (सिडको), नवी मुंबई**